॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. ४ जून २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १० वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

* सुविचार *
अनुभवासारखे दुसरे शिक्षण नाही

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### कंगाल

सत्ता आली की येतो
पक्षही असा पळवता
विरोधाचा प्रखर प्रवाह
दबावाखाली वळवता
या उबेला सोसवेना
विजनवासाचा वारा
कोणी काय पळवावे
नैतिकतेचाच खेळ सारा

वीरभूमी

## SPOT NEWS

### दिल्लीत हॉटेलला लागलेल्या आगीत ८ जणांचा मृत्यू

● **नवी दिल्ली –** राजधानी दिल्लीतील मालवीय नगर भागात एका हॉटेलवजा रेस्तराँला लागलेल्या भीषण आगीत एकूण २१ जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. या अत्यंत वेदनादायी दुर्घटनेत गुरुग्राममधील प्रसिद्ध चार्टर्ड अकाउंटंट विवेक अग्रवाल यांच्या कुटुंबावर काळाने भीषण घाला घातला. विवेक अग्रवाल यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील तब्बल आठ जणांचा या आगीत करुण अंत झाला. या हृदयद्रावक घटनेनंतर आता या संपूर्ण कुटुंबात केवळ त्यांचे ८० वर्षांचे आजारी आणि वृद्ध वडील राधेश्याम अग्रवाल हे एकटेच जिवंत उरले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, गुरुग्रामच्या सेक्टर ४६ मध्ये राहणारे सीए विवेक अग्रवाल यांचे ८० वर्षीय वडील राधे श्याम अग्रवाल यांच्यावर दिल्लीतील मॅक्स रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आपल्या आजारी वडिलांची विचारपूस करण्यासाठी आणि त्यांना भेटण्यासाठी विवेक अग्रवाल हे संपूर्ण कुटुंबासह दिल्लीत आले होते. त्यांनी मॅक्स रुग्णालयाजवळच असलेल्या मालवीय नगरमधील 'फ्लरिश स्टे' या हॉटेलमध्ये दोन खोल्या बुक केल्या होत्या. बुधवारी सकाळी साडेआठच्या सुमारास विवेक अग्रवाल, त्यांची पत्नी तर्जनी, आई प्रेमलता, दोन मुली जिविसा आणि वारिया यांच्यासह त्यांचे मामा अशोक गोयल, मामी कमला गोयल आणि आणखी एक काका झुमरीलाल गोयल असे सर्वजण हॉटेलच्या रेस्तराँ भागात एकत्र नाश्ता करत होते. त्याच वेळी अचानक तिथे भीषण आग लागली.

# श्रीरामपुरात एटीएसची छापेमारी

## सोशल मीडियाच्या माध्यमातून पाकिस्तानी गँगशी संपर्कात असलेल्या चौघांची चौकशी

● **श्रीरामपूर I वीरभूमी –**
श्रीरामपूर शहरात महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) दाखल होत कारवाई केली, शहराच्या विविध भागांतील सात ते आठ ठिकाणी एकाचवेळी छापे टाकले. सोशल मीडियाच्या माध्यमातून पाकिस्तानशी संबंधित रिल्स पहाणे व त्यावर आक्षेपार्ह स्वरुपाच्या प्रतिटक्रीया केल्याच्या संशयावरून शहरातील चार जणांची सखोल चौकशी करुन त्यांना नोटीसाही बजविल्याचे समजते.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, पाकिस्तानातील कथित गुन्हेगारी टोळ्यांशी संबंधित काही व्यक्तींशी श्रीरामपूरमधील काही तरुणांचा संपर्क असल्याची माहिती तपास यंत्रणांना प्राप्त झाली होती. या माहितीच्या आधारे एटीएसने शहरातील विविध ठिकाणी नियोजनबद्ध छापेमारी करत संशयित व्यक्तींची




चौकशी सुरू केली. तपास यंत्रणांच्या प्राथमिक अंदाजानुसार, सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून संपर्क प्रस्थापित करून काही महत्त्वाच्या व्यक्तींबाबत माहिती संकलित करण्याचा प्रयत्न झाल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

तसेच काही ठिकाणांची रेकी करण्यात आल्याचा संशयही तपासाच्या केंद्रस्थानी आहे. या अनुषंगाने जप्त करण्यात आलेल्या डिजिटल पुराव्यांचे बारकाईने विश्लेषण करण्यात येत आहे. कारवाईदरम्यान संशयितांकडून मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरणे तसेच सोशल मीडिया व्यवहारांशी संबंधित माहिती जप्त करण्यात आली आहे. या तपासातून आणखी महत्त्वपूर्ण माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, संपूर्ण प्रकरणाचा विविध अंगांनी तपास सुरू आहे. या कारवाईमुळे शहरात खळबळ उडाली असून सोशल मीडियावरील हालचालींवर सुरक्षा यंत्रणांचे बारकाईने लक्ष असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

### एसटी आगारातील शौचालयांसाठी शुल्क आकारू नये; परिवहन महामंडळाकडून अखेर परिपत्रक जारी

● **मुंबई I वीरभूमी –**
एसटी बसस्थानकांवरील शौचालये मोफत करण्याची घोषणा होऊनही अनेक ठिकाणी प्रवाशांकडून शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी येत होत्या. यावर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) राज्यातील सर्व विभाग नियंत्रकांना परिपत्रक जारी करून बसस्थानकांवरील शौचालयांसाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारू नये, अशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटीच्या वर्धापन दिनानिमित्त शौचालये मोफत करण्याची घोषणा केली होती. मात्र, मुंबईतील कुर्ला, दादर, मुंबई सेंट्रल, चेंबूरसह काही बसस्थानकांवर अद्याप शुल्क आकारले जात असल्याचे पाहणीत समोर आले होते. त्यानंतर अवघ्या काही तासांत एसटी प्रशासनाने राज्यव्यापी परिपत्रक काढत शुल्क आकारणी थांबविण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे दररोज एसटीने प्रवास करणा-या लाखो प्रवाशांना दिलासा मिळणार असून बसस्थानकांवरील मूलभूत सुविधा विनामूल्य उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

महामंडळाने बसस्थानके, स्वच्छतागृहे, फिरती स्वच्छतागृहे, चालक-वाहक विश्रांतीगृहे यांच्या स्वच्छता व देखभालीसाठी १ जून २०२६ पासून तीन वर्षांसाठी मे. स्मार्ट सव्हिसेस प्रा.लि. पुणे व मे. क्रिस्टल इंटिग्रेटेड सव्हिसेस प्रा.लि. मुंबई या कंपन्यांची नियुक्ती केली आहे. दरम्यान, यानंतर देखील शुल्क आकारणी झाल्यास काय कारवाई होणार याबाबत स्पष्टता नाही.

## राहुरी कृषी विद्यापीठच्या कंत्राटी युवकाची निर्घृण हत्या

● **राहुरी I वीरभूमी –**
राहुरी-शनिशिंगणापूर मार्गालगत असलेल्या राहुरी कृषी विद्यापीठाच्या कापूस सुधार प्रकल्पाच्या प्रक्षेत्रावर मंगळवारी रात्री घडलेल्या एका भीषण हत्याकांडाने संपूर्ण राहुरी तालुका हादरून गेला आहे. प्रकल्पाच्या कार्यालयात कंत्राटी मजूर म्हणून कार्यरत असलेल्या २७ वर्षीय तरुणाची अज्ञात व्यक्तीने धारदार शस्त्राने वार करून निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून परिसरात भीती व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मृत युवकाचे नाव श्रीकांत पोपट दोंदे (वय २७, रा. गोटुंबे आखाडा, ता. राहुरी) असे आहे. श्रीकांत हा कापूस सुधार प्रकल्पाच्या प्रक्षेत्रावरील कार्यालयात ठेकेदारामार्फत कंत्राटी मजूर म्हणून कार्यरत होता. मंगळवारी नेहमीप्रमाणे सायंकाळी सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास तो कामासाठी कार्यालयात दाखल झाला होता. त्याची ड्युटी रात्री एक वाजेपर्यंत होती.दरम्यान, त्याच ठिकाणी कार्यरत असलेले दुसरे कंत्राटी कर्मचारी बंडू बर्डे हे रात्री सुमारे साडेनऊ वाजण्याच्या सुमारास ड्युटीवर आले. नेहमीप्रमाणे श्रीकांत आपल्या ठरावीक ठिकाणी दिसून न आल्याने त्यांनी परिसरात शोधाशोध सुरू केली. बॅटरीच्या प्रकाशात कार्यालयाच्या मागील बाजूस पाहणी करत असताना त्यांना एक हृदयद्रावक दृश्य दिसले.

श्रीकांत दोंदे हा रक्ताच्या थारोळ्यात निपचित पडलेला आढळून आला. त्याच्या शरीरावर गंभीर स्वरूपाचे घाव असल्याचे दिसून आले. घटनेची माहिती तत्काळ विद्यापीठाचे सुरक्षा अधिकारी गोरक्षनाथ शेटे यांना देण्यात आली. त्यानंतर राहुरी पोलिसांना कळविण्यात आले. माहिती मिळताच पोलिस यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाली. श्रीरामपूर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर, राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्यासह पोलीस अधिकारी, कर्मचारी, श्वान पथक आणि फॉरेन्सिक तज्ज्ञांनी घटनास्थळी धाव घेत तपासाची सूत्रे हाती घेतली. घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर अज्ञात हल्लेखोराने तीक्ष्ण हत्याराने वार करून हत्या केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.हत्येमागील कारण अद्याप गूढच असून वैयक्तिक वाद, जुने वैमनस्य की अन्य काही कारण, याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तांत्रिक तपास, कॉल रेकॉर्ड, परिसरातील हालचाली तसेच विविध संशयाच्या धाग्यांवर काम सुरू केले आहे. श्वान पथक आणि फॉरेन्सिक पथकाकडूनही महत्त्वाचे पुरावे संकलित करण्यात आले आहेत.

दरम्यान, श्रीकांत दोंदे यांच्या अकाली आणि दुर्दैवी मृत्यूमुळे गोटुंबे आखाडा परिसरावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात आई-वडील, भाऊ आणि बहीण असा परिवार आहे. कुटुंबाचा आधारवड हिरावल्याने नातेवाईक आणि ग्रामस्थांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

# अन्न भेसळविरोधी मोहिमेत राहुरी व नेवासात कारवाई

## आईस्क्रीम व खाद्यतेलाचा २ लाख ८४ हजार किंमतीचा साठा जप्त

● **अहिल्यानगर I वीरभूमी -**
जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या अन्न भेसळविरोधी विशेष मोहिमेत राहुरी व नेवासा तालुक्यात कारवाई करून २ लाख ८४ हजार १८० रुपये किमतीचे संशयित आईस्क्रीम व खाद्यतेल जप्त करण्यात आले असून नागरिकांना अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत शंका असल्यास प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त अन्न अ. अ. भोईटे यांनी केले आहे.

राहुरी येथील शिवशक्ती आईस्क्रीम या आस्थापनाची तपासणी करून शिवशक्ती ब्रँडच्या आईस्क्रीम गुलकंद व अमेरिकन नट्स या उत्पादनांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. दर्जाहीन असल्याच्या संशयावरून या ठिकाणी ४१ हजार ४४० रुपये किमतीचे एकूण १४८ पॅकेट्स आईस्क्रीम जप्त करण्यात आले. तसेच नेवासा तालुक्यातील कडू गल्ली येथील संतोष किराणा स्टोअर्सची तपासणी करून एसबीजी ब्रँडच्या रिफाइंड पामोलीन ऑईल या खाद्यतेलाचा नमुना तपासणीसाठी घेण्यात आला. हा साठा संशयास्पद आढळल्याने २ लाख ४२ हजार ७४० रुपये किमतीचे १ हजार ४९८.४ किलो खाद्यतेल जप्त करण्यात आले.

अन्न व औषध विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार व सहआयुक्त श्रीकांत करकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ व नियम २०११ अंतर्गत ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत अन्न सुरक्षा अधिकारी प्रदीप पवार, अन्न सुरक्षा अधिकारी उ. र. पाटील व सहायक आयुक्त अन्न अ. अ. भोईटे यांनी या कारवाया केल्या आहेत.

नागरिकांना स्वच्छ व भेसळमुक्त अन्न उपलब्ध व्हावे यासाठी जिल्हाभर ही मोहीम अधिक व्यापक स्वरूपात सुरु आहे. अन्न सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



## बोल्हेगाव परिसरात दोन गटांत हाणामारी; सहा जण जखमी

● **अहिल्यानगर I वीरभूमी -**
शहरातील बोल्हेगाव परिसरातील खंडोबानगर येथील मोरया पार्क हाऊसिंग सोसायटीमध्ये सामाईक बोअरवेलच्या मोटरची पिन काढण्याच्या कारणावरून दोन शेजारी कुटुंबांमध्ये वाद होऊन तो हाणामारीपर्यंत पोहोचला. या प्रकरणात दोन्ही बाजूंनी एकमेकांविरोधात फिर्याद दिल्याने तोफखाना पोलीस ठाण्यात परस्परविरोधी दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दोन गटाचे सहा जण जखमी झाले आहेत.

महादेव जालिंदर साळुंके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बबलू युनुस शेख, त्यांची पत्नी मुस्कान शेख, मुलगा अयान शेख, पप्पू नावाच्या व्यक्तीसह अन्य काही जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित आरोपींनी घरात घुसून शिवीगाळ करत मारहाण केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. मारहाणीत फिर्यादीची पत्नी, बहिण, मेव्हणे व मुलगा जखमी झाले आहेत.

दरम्यान, याच घटनेप्रकरणी मुस्कान बबलू शेख यांनीही प्रतिफिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार, दिपाली दिनेश पवार, महादेव जालिंदर साळुंके, दिनेश भिवा पवार, हर्षद महादेव साळुंके, पूजा महादेव साळुंके, ज्ञानेश्वर धोंडीबा साळुंके व अन्य काही जणांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. संशयित आरोपींनी घरात घुसून फिर्यादी व त्यांच्या मुलाला मारहाण केली. तसेच रायफलने ठार मारण्याची धमकी दिल्याचा आरोपही फिर्यादीत करण्यात आला आहे. फिर्यादी व मुलगा जखमी झाला आहे.

# SPOT NEWS

## देहेरे येथे रिपाईच्या युवक तालुकाध्यक्षावर दांडक्याने जीवघेणा हल्ला

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
नगर तालुक्यातील देहेरे गावात दोन गटांमध्ये सुरू असलेल्या वादाकडे पाहण्यासाठी गेलेल्या एका युवकावर नऊ जणांच्या टोळक्याने कोयते आणि बेसबॉलच्या दांडक्यांनी जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेले रिपब्लिकन पक्षाचे युवक नगर तालुकाध्यक्ष जयराम सुरेश आंग्रे यांच्यावर सध्या अहिल्यानगर येथील शासकीय जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून, हल्लेखोरांविरुद्ध तातडीने गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. जखमी जयराम आंग्रे यांनी सांगितलेल्या माहितीनुसार, सोमवारी (दि. १ जून) रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास देहेरे गावात दोन गटांमध्ये वाद सुरू होता. यावेळी चौकात बसलेल्या जयराम आंग्रे यांना मोठा गोंधळ आणि आरडाओरडा ऐकू आल्याने ते नेमके काय घडत आहे हे पाहण्यासाठी घटनास्थळाच्या दिशेने गेले. त्यांच्यासोबत त्यांचे मित्र अजय रोकडे हे देखील होते. अंगणवाडीसमोर पोहोचताच एका गटातील सात ते आठ जणांचे टोळके अचानक त्यांच्या अंगावर धावून आले. सुरू असलेल्या भांडणाशी आपला कोणताही संबंध नसल्याचे सांगूनही संबंधितांनी त्यांच्यावर हल्ला चढविला. हल्लेखोरांनी हातातील कोयते आणि बेसबॉलच्या दांडक्यांनी बेछूट मारहाण केल्याचा आरोप आंग्रे यांनी केला आहे. या हल्ल्यात त्यांच्या पाठीवर, डोक्यावर आणि शरीराच्या विविध भागांवर गंभीर दुखापती झाल्या. कोयत्याने वार करण्यात आल्याने तसेच दांडक्यांनी मारहाण केल्याने ते गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्यांना तातडीने उपचारासाठी अहिल्यानगर शासकीय जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची माहिती नगर तालुका पोलीस ठाण्यात देण्यात आली असून पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, हल्लेखोरांपैकी काही जण खासदाराचे कार्यकर्ते असल्याने पोलिसांवर दबाव टाकला जात असल्याचा आरोप जखमी युवकाने केला आहे.

## बाबुर्डी घुमट येथील शेतकऱ्यांची रस्त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
अहिल्यानगर तालुक्यातील बाबुर्डी घुमट येथील शिंदे मळा परिसरातील शेतकऱ्यांनी शेतात ये-जा करण्यासाठी कायमस्वरूपी रस्ता उपलब्ध करून देण्याची मागणी करत जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून रस्त्याअभावी शेतीची कामे करताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. यावेळी गोरख जाधव, कांताबाई जाधव, दिनेश निकाळजे, प्रिया निकाळजे, सुनील कांबळे, दानियल तिजोरे, संगीता तिजोरे यांच्यासह परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बाबुर्डी घुमट येथील गट क्रमांक २७९ मधील जमीन दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेअंतर्गत ७ लाभार्थ्यांना सन २००७ मध्ये वाटप करण्यात आली होती. मात्र, जमीन मिळून जवळपास दोन दशके उलटूनही संबंधित शेतजमिनीपर्यंत जाण्यासाठी कोणताही अधिकृत रस्ता उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. त्यामुळे शेतीची मशागत, पिकांची वाहतूक तसेच दैनंदिन शेतीकामे करताना मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे शेतरस्ता उपलब्ध करून देण्याची मागणी वारंवार केली असूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

# तालुका विकासाची कामधेनू जतन करण्यासाठी सर्वांनी एकत्र यावे

## चेअरमन राजेंद्रदादा नागवडे । सहकार महर्षी स्व. शिवाजीराव नागवडे साखर कारखान्याचे मील रोलरचे पूजन



**● श्रीगोंदा । वीरभूमी –**
सहकार महर्षी स्व. शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखाना हा श्रीगोंदा तालुक्याच्या विकासाची कामधेनू असून तिचे जतन व संवर्धन करण्याची सामूहिक जबाबदारी संचालक मंडळासह सभासद, ऊस उत्पादक शेतकरी व कामगार यांची असल्याचे प्रतिपादन कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे यांनी केले.

कारखान्याच्या सन २०२६-२७ या ५२ व्या गळीत हंगामाच्या रोलर पूजनाचा कार्यक्रम मंगळवार (दि. २) रोजी कारखान्याच्या इंजिनिअरिंग विभागात उत्साहात पार पडला. कारखान्याच्या व्हा. चेअरमन सौ. मेघाताई औटी यांचे पती संदीप औटी, संचालक एकनाथराव आळेकर, विश्वनाथ गिरमकर, बंडू जगताप व आप्पासाहेब धायगुडे यांच्या हस्ते रोलरची विधिवत पूजा करण्यात आली.

यावेळी कारखाना सेवेतून सेवानिवृत्त होत असलेल्या २२ सेवकांचा सत्कार करून त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना राजेंद्रदादा नागवडे म्हणाले की, एकेकाळी दुष्काळग्रस्त असलेल्या श्रीगोंदा तालुक्याला नंदनवन बनविण्यासाठी स्व. शिवाजीराव बापू नागवडे यांनी अथक परिश्रम घेतले. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच आज कारखाना ५२ व्या गळीत हंगामात पदार्पण करत असल्याचा अभिमान वाटतो.

कारखान्याच्या माध्यमातून हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह उभा राहिला असून अनेकांच्या जीवनाला आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले आहे. मात्र बदलत्या काळात सहकारी साखर कारखानदारीसमोर विविध आव्हाने उभी राहिली आहेत. या आव्हानांचा समर्थपणे सामना करून कारखान्याचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी सर्व घटकांनी एकदिलाने प्रयत्न करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

येत्या गळीत हंगामात आठ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून सभासद शेतकऱ्यांनी आपला ऊस कारखान्याकडे गळीतासाठी देऊन सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. नागवडे कारखाना ऊस दर देण्यात कधीही मागे राहिलेला नाही आणि भविष्यातही राहणार नसल्याची ग्वाही देत उच्चांकी गाळप झाल्यास शेतकऱ्यांना उच्चांकी भाव देणे शक्य होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रास्ताविकात संचालक सुभाष शिंदे यांनी कामगार हा साखर उद्योगातील अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याचे सांगितले. कामगारांनी जबाबदारीने काम केल्यास कारखाना उत्तमरीत्या चालतो, अन्यथा अनेक अडचणी निर्माण होतात. नागवडे कारखान्याचे कर्मचारी अभिमान वाटावा असे काम करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

सेवानिवृत्त सेवक संजय मेहेत्रे व किसन कोल्हटकर यांनी आपल्या सेवाकालातील अनुभव कथन करत कारखाना व नागवडे परिवाराप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमास संचालक राकेश पाचपुते, श्रीनिवास घाडगे, योगेश भोईटे, शरद जगताप, लक्ष्मण रायकर, प्रशांत दरेकर, प्रा. सुरेश रसाळ, प्रशांत शिपलकर, विठ्ठल जंगले, सावता हिरवे, भाऊसाहेब बरकडे, मारुती पाचपुते, विठ्ठल भोईटे, कामगार युनियनचे अध्यक्ष रामभाऊ लबडे, कार्यकारी संचालक प्रवीण शिंदे, विविध विभागांचे प्रमुख, कामगार व सभासद शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व सूत्रसंचालन भाऊसाहेब बांदल यांनी केले तर चीफ इंजिनिअर भरत नलगे यांनी आभार मानले.

## एस.एस.जी.एम. महाविद्यालयाच्या विकास समितीच्या चेअरमनपदी ॲड. संदीप वर्पे



**● कोपरगाव । वीरभूमी–**
रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरु गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स (एस. एस. जी. एम.) महाविद्यालय, कोपरगावच्या विकास समितीच्या चेअरमपदी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ॲड. संदीप वर्पे यांची निवड करण्यात आली आहे.

ॲड. संदीप वर्पे यांच्या विकास समितीच्या चेअरमनपदी झालेल्या या निवडीबद्दल महाविद्यालय व्यवस्थापन समितीचे सदस्य आमदार विवेकभैय्या कोल्हे, चैतालीताई काळे, सुनील गंगुले, महेंद्रशेठ काले, बाळासाहेब आव्हाड, ज्ञानेश्वर वाकचौरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे, कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. बंडेराव तऱ्हाळ, विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ. घनश्याम भगत, वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य डॉ. अर्जुन भागवत, कार्यालय अधीक्षक सुनील गोसावी तसेच सर्व कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. याशिवाय माजी विद्यार्थी व विविध क्षेत्रांतील मान्यवरांनीही शुभेच्छा व्यक्त केल्या. ॲड. वर्पे यांच्या अनुभव संपन्न नेतृत्वाचा लाभ महाविद्यालयाच्या शैक्षणिक, भौतिक व सर्वांगीण विकासासाठी होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला असून त्यांच्या निवडीमुळे विकासकामांना अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## चोंभुत गावामध्ये 'आनंद महोत्सवात ३०० ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान




**● पारनेर । वीरभूमी–**
तालुक्यातील चोंभुत गावामध्ये 'आनंद महोत्सव २०२६' अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. या महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे गावातील ३०० ज्येष्ठ नागरिकांना सन्मानित करून साजरा करण्यात आलेला अभिष्टचिंतन सोहळा. या सोहळ्यात खा. निलेश लंके यांच्या हस्ते ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करत केक कापण्यात आला, तसेच सर्व ज्येष्ठांना मोलाच्या भेटवस्तू देण्यात आल्या.

यावेळी खा. लंके यांनी चोंभुत गावकऱ्यांचे भरभरून कौतुक केले. ज्येष्ठ नागरिकांचा आदर राखून त्यांना समाजात मानाचे स्थान देणे आणि अशा पद्धतीचा कौतुकास्पद उपक्रम इतक्या दृढ भावनेने राबवणे ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे, अशा शब्दांत त्यांनी गावकऱ्यांच्या उपक्रमाची प्रशंसा केली व कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. या सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे खासदार लंके यांचे आई-वडील ज्ञानदेव लंके व शकुंतला लंके यांचीही कार्यक्रमाला सन्माननीय उपस्थिती होती. या महोत्सवा निमित्ताने चोंभुत गावात दिवसभर भजनाचे सूर घुमत होते. त्यानंतर ह. भ. प. सचिन महाराज पवार यांच्या सुश्राव्य हरी कीर्तन झाले. कार्यक्रमादरम्यान सद्गुरू गोपाल मुनी दामोदेकर व पालवे बाबा यांचे उपस्थित भाविकांना आशीर्वादरूपी संबोधन लाभले. यावेळी नव्याने पोलीस निरीक्षक पदावर नियुक्त झालेल्या गावाच्या कन्या नीलम खांडकर आणि स्पर्धा परीक्षांमध्ये घवघवीत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. या सोहळ्याला चोंभुतच्या सरपंच कांचनताई म्हस्के, उपसरपंच निर्मला माळी, तंटामुक्ती अध्यक्ष संतोष खाडे, लक्ष्मण म्हस्के, तसेच ग्रामपंचायत सदस्य प्रणल भालेराव, स्वाती दरेकर, आरती सांगडे, स्वप्नील पारखे, मच्छिंद्र माळी, खंडू खाडेकर, सचिन भालेराव, जनाजी म्हस्के, सोनभाऊ खांडेकर, रामदास पारखे, बाळासाहेब मेहेर, धनंजय मेहेर, दत्तात्रय म्हस्के, रेवजी शिगदाळे गुरुजी, नारायण बरकडे, पंढरीनाथ कोल्हे, हिरामण पारखे, खंडू कोल्हे, बाबुराव म्हस्के, लहू म्हस्के आणि देविदास दरेकर यांच्यासह गावातील ज्येष्ठ नागरिक, तरुण आणि माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# शेवगावचे नगरसेवक रिजवान शेख यांचे जात प्रमाणपत्र रद्द

## ओबीसी प्रवर्गातील 'मुलाणी' जातदावा अमान्य । जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचा निर्णय

**● शेवगाव । वीरभूमी–**
शेवगाव नगरपरिषदेतील प्रभाग क्रमांक ३ मधून नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) राखीव जागेवर निवडून आलेले नगरसेवक रिजवान छोटुभाई शेख यांचा 'मुलाणी' (इतर मागास वर्ग) जातीचा दावा जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, अहिल्यानगर यांनी अमान्य ठरविला आहे. समितीने त्यांचे जात प्रमाणपत्र रद्द करण्याचे आदेश दिल्याने शेवगावच्या राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे.

समितीने १ जून २०२६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार, उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांनी ७ जानेवारी २०२१ रोजी निर्गमित केलेले 'मुलाणी (३४०)' प्रवर्गातील जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र जात प्रमाणपत्र पडताळणी अधिनियम, २००० मधील तरतुदीनुसार संबंधित प्रमाणपत्राच्या आधारे मिळालेले लाभ रद्द होऊ शकतात आणि त्यांची वसुलीही करण्यात येऊ शकते, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.



या प्रकरणात शिवसेना (शिंदे गट) चे पराभूत उमेदवार प्रताप मुकुंदराव फडके यांनी जातदाव्यावर हरकत घेत तक्रार दाखल केली होती. अर्जदाराने सादर केलेली वंशावळ, पूर्वजांची माहिती आणि जातीच्या दाव्यासाठी वापरलेले पुरावे संशयास्पद असल्याचा आरोप त्यांनी केला होता. त्यानंतर जिल्हा जात पडताळणी समितीने दक्षता पथकाच्या माध्यमातून सखोल चौकशी केली.

चौकशीदरम्यान अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये 'मुलाणी' जातीचा स्पष्ट उल्लेख नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. तसेच कोपरगाव तालुक्यातील धोत्रे येथील मोडी लिपीतील जन्म उताऱ्याची पडताळणी केली असता, मूळ शासकीय अभिलेखात संबंधित नोंद उपलब्ध नसल्याचे आढळून आले. याबाबत तहसीलदार, कोपरगाव यांनीही लेखी अभिप्राय दिला होता.

समितीने आपल्या निर्णयात अर्जदाराच्या वंशावळीतील नातेसंबंध सिद्ध करणारे ठोस महसुली अथवा शासकीय पुरावे उपलब्ध नसल्याचे नमूद केले आहे. तसेच विविध कागदपत्रांमधील नावांतील विसंगती, मूळ गावाबाबत पुरेशा पुराव्यांचा अभाव आणि पारंपरिक 'मुलाणकी' व्यवसायाचा दस्तऐवजी पुरावा सादर करण्यात आलेले अपयश या बाबींचाही उल्लेख करण्यात आला आहे.

दुसरीकडे, अर्जदाराने तक्रार राजकीय हेतूने आणि निवडणुकीतील पराभवानंतर सूडबुद्धीने करण्यात आल्याचा दावा केला होता. तसेच काही जुने दस्तऐवज, शपथपत्रे आणि सामाजिक परंपरांच्या आधारे आपला जातदावा योग्य असल्याचे समितीसमोर मांडले होते. मात्र, उपलब्ध पुरावे, दक्षता पथकाचा अहवाल, दोन्ही पक्षांचा युक्तिवाद आणि कायदेशीर तरतुदींचा विचार करून समितीने जातदावा सिद्ध न झाल्याचा निष्कर्ष नोंदविला.

समितीच्या तीन सदस्यीय खंडपीठाने एकमताने हा निर्णय दिला असून, आदेशाविरुद्ध संबंधितांना उच्च न्यायालयात दाद मागण्याचा पर्याय उपलब्ध आहे. या निर्णयानंतर शेवगावच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असून, पुढील कायदेशीर आणि राजकीय घडामोडींवर सर्वांचे लक्ष लागले आहे.

## विशेष सहाय्य योजनेच्या लाभार्थ्यांनी ३० जुलैपर्यंत ऑनलाईन हयातीचे प्रमाणपत्र सादर करावे

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ राज्य निवृत्तीवेतन योजनेतील लाभार्थ्यांनी हयातीचे प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीने प्राप्त करून ३० जुलै २०२६ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. योजनेचे अनुदान नियमितपणे सुरू राहण्यासाठी सर्व लाभार्थ्यांनी ही प्रक्रिया विहित मुदतीत पूर्ण करावी, असे आवाहन पारनेर तहसीलदार गायत्री सौंदाणे यांनी केले आहे.

शासनाच्या नव्या निर्णयानुसार हयातीचे प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीने सादर करण्यास मान्यता देण्यात आली असून त्यासाठी ५० रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे. स्मार्टफोन असलेले लाभार्थी प्ले स्टोअरवरून "Beneficiary Verification' व "Aadhaar Face RD' हे ॲप डाउनलोड करू शकतात. या पवर आधार क्रमांक व मोबाईल क्रमांकाच्या साहाय्याने नोंदणी करून चेहरा किंवा बोटांच्या ठशांची पडताळणी केल्यानंतर हयातीचे प्रमाणपत्र प्राप्त करता येईल.

ज्यांच्याकडे स्मार्टफोन नाही, अशा लाभार्थ्यांसाठी सेतू केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र किंवा नागरी सेवा केंद्रांवर ही सुविधा उपलब्ध आहे. ऑनलाईन हयातीचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर ते संबंधित तलाठी यांच्याकडे सादर करावे.

या प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रे व अटींची पूर्तता करणे गरजेचे आहे. लाभार्थ्यांनी स्वतःच्या आधार कार्डची छायाप्रत सोबत ठेवणे आवश्यक आहे. तसेच त्यांचा अद्ययावत मोबाईल क्रमांक बँक खात्याशी जोडलेला असणे बंधनकारक आहे. लाभार्थ्यांचे बँक खाते आधारशी संलग्न (मॅपिंग) असणे आवश्यक असून त्यानंतरच हयातीचे प्रमाणपत्र प्राप्त करण्याची प्रक्रिया पूर्ण करता येईल.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# हिम्मत असेल तर त्यांनी राजीनाम्याची तयारी दाखवा

**नगराध्यक्ष पराग संधान यांचे विरोधकांना खुले आव्हान । तुम्ही चार हजार कोटींचा हिशोब द्या आम्ही चार महिन्याचा देण्यास तयार**

**कोपरगाव । वीरभूमी –**

नगरपरिषदेच्या सत्तांतर नगराध्यक्ष परागसंधान व नगरसेवक यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत आपल्या चार महिन्यात झालेल्या कामकाजाचा लेखाजोखा शहरासमोर मांडला आहे. मा.आ. स्नेहलताताई कोल्हे व आमदार विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विकास कामांचा पाठपुरावा सुरू असून जनतेला दिलेले शब्द पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्धपणे काम करतो आहोत अशी भूमिका नगराध्यक्ष पराग संधान यांनी यावेळी मांडली.



स्वच्छतेचे काम पूर्वी सुरळीत नव्हते. आता आरोग्य सभापती वैभव आढाव यांनी स्वतः प्रत्येक प्रभागात स्वच्छता अभियान राबवत प्रभावी काम सुरू केले आहे. नवीन टेंडरमध्ये मनुष्यबळ वाढवले आहे, घंटागाडी संख्या वाढवल्या आहे. नालेसफाई सुरू झाली असून शहरातील विविध भागातील नाले स्वच्छ करून पावसाळ्यात होणारी समस्या कमी करण्याचा आमचा प्रयत्न आहे. शहरात चारच महिन्यात ७२६ ढापे टाकले. स्ट्रीटलाईट आणि हायमॅक्स टाकले आहे व अनेक ठिकाणी टाकण्याचे काम सुरू आहे.

प्रशासन काळात नगरपालिका फवारणी फक्त तीन चार वेळा होत होती. आम्ही सत्तेत आल्यानंतर जुना ठेकेदार फवारणी करण्यास येत नव्हता त्याला कुणाचा आशीर्वाद होता हे संशोधन करावे लागेल. आम्ही पालिकेच्या माध्यमातून नव्याने झालेल्या टेंडरमध्ये सुधारणा करून वर्षातून सात ते आठ वेळा फवारणी करण्याचा मानस आहे. घरपट्टी आणि पाणीपट्टी व वीजबिल थकबाकी याबद्दल सविस्तर लेखाजोखा मांडला. पाणीपट्टी थकबाकीमुळे पाणी बंद का करू नये अशा नोटीस आल्या. पाणी पट्टी थकल्यामुळे पाणी करार करण्यास अडचणी आल्या. दंड आणि व्याज यात पालिकेचे नुकसान पूर्वीच्या कारभारामुळे सोसावे लागत आहे. जनतेला ७ कोटीहून अधिक रकमेचा दंड सोसावा लागला आहे यावर विस्तृत मांडणी केली. पाच नंबर तलावाची हायड्रॉलिक टेस्ट करण्यात आलेली नव्हती त्यापूर्वीच उद्घाटनाचा गाजावाजा झाला. आम्ही ती टेस्ट करून घेतली तिचा अद्याप अहवाल येणे बाकी आहे. त्याचेही थर्ड पार्टी ऑडिट करून घेणार आहे आम्ही. पाइपलाइन टाकलेल्या होत्या त्या जोडलेल्या नव्हत्या. नवीन पाण्याच्या टाक्या आम्ही सुरू करण्याचा निर्णय घेतला कारण पूर्वीचे प्रलंबित कामामुळे जनतेला नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

फिल्टरेशन प्लांटचे काम काही प्रमाणात केल्याने थोडे चांगले पाणी नागरिकांना मिळाले. पाणीपुरवठा सभापती वैशालीताई वाजे चांगले काम करत आहेत. यापुढे पूर्ण काम काही काळात सुरू करणार आहोत आचार संहिता नंतर त्या प्रक्रियेला गती देण्याचा प्रयत्न आहे.पाइपलाइन गाळमुक्त करून स्वच्छ करणार आहोत.

अद्ययावत स्वच्छता गृह आपण लवकरच शहरात बसवतो आहोत त्यात पाणी आणि स्वच्छता याला प्राधान्य असावे हा उद्देश आहे. पूर्वीचे जुने स्वच्छतागृह खराब होते त्यामुळे ७५ टॉयलेट आपल्याला मंजूर झाले आहे उर्वरित अजून ७५ देखील मंजूर होणार आहे. रुग्णवाहिकेचे दिलेले आश्वासन पूर्ण केले आहे ती लोकसेवेत सुरू आहे. विश्वासनामा जाहीर करत आम्ही भ्रष्टाचारमुक्त कारभाराचा शब्द दिला आहे. सध्या होणाऱ्या भूमिगत गटारीचे कामे नागरिकांना कळावे म्हणून फलक लावत पारदर्शक काम ठेवले आहे.

आम्ही सत्तेत आल्यानंतर विरोधकांनी चारच महिन्यात आम्हाला हिशोब विचारायला सुरवात केली मात्र त्यांनी स्वतःचा चार हजार कोटींचा जो खोटा डांगोरा पेटला त्याचा हिशोब देण्याची तयारी दाखवावी जर त्यांची तयारी असेल तर जनतेच्या समोर सोक्षमोक्ष करण्यास तयार आहोत. आमच्या कारभारात गैर आढळल्यास आम्ही राजीनामा देऊ तुमच्या कारभारात आढळल्यास तुम्ही राजीनामा देणार का असे खुले आव्हानच नगराध्यक्ष पराग संधान यांनी विरोधकांना दिले आहे.

बबलूशेठ वाणी, अतुलशेठ काले, विनोद राक्षे, संदीप देवकर, अनिल आव्हाड, रवींद्र कथले, कैलास मंजुळ, सुरेखा राक्षे, विजया देवकर, निलोफर पठाण, स्वप्निल मंजुळ, संजय उदावंत, कलविंदर दडियाल, प्रतीक पगारे यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# SPOT NEWS



## प्रा.योगेश भुसारी यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**पारनेर । वीरभूमी–**

समाजात एक जागरूक नागरिक म्हणून वावरताना विद्यार्थी घडविण्याचे पवित्र कार्य अविरतपणे सुरू ठेवल्याबद्दल शैक्षणिक सामाजिक, साहित्यीक व आध्यात्मिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल धन्वंतरी कला व विज्ञान महाविद्यालय ढवळपुरी या महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक योगेश शंकर भुसारी यांना २०२६ या वर्षाचा मानाचा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे आदर्श गाव निमगाव वाघा येथे सुरू असलेल्या भव्य हरिनाम सप्ताहामध्ये ह.भ.प. आदरणीय कृष्णकृपांकित डॉ. विकासानंद महाराज मिसाळ यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रा. योगेश भुसारी यांना प्रधान करण्यात आला. श्री नवनाथ वारकरी शिक्षण संस्थेच्या वतीने या पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते. ढवळपुरी गावातील रहिवासी असलेले प्रा. योगेश भुसारी सर हे केवळ शालेय शिक्षणापुरते मर्यादित न रहता ते उत्कृष्ट किर्तनकार व प्रवचनकार आहे. सरांच्या मार्गदर्शनाखाली आजवर अनेक विद्यार्थी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये व अनेक प्रकारच्या भरतीमध्ये घवघवीत यश मिळवले आहेत सध्या ते ग्रामीण भागामध्ये प्रवचनाच्या आणि किर्तनाच्या माध्यमातून प्रबोधनाचे व धार्मिक कार्य अत्यंत निष्ठेने करत आहेत. प्रा. योगेश भुसारी यांच्या या अष्टपैलू व बहुमोल कार्याची दखल घेऊन नवनाथ वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. विठ्ठल महाराज फलके यांच्या संस्थेच्या वतीने त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## विमल नेहे यांचे निधन

**अकोले । वीरभूमी–**



तालुक्यातील सुगाव खुर्द विकास सोसायटीच्या संचालिका सौ. विमल वसंत नेहे (वय ७४) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सुगाव खुर्द येथील ज्येष्ठ कार्यकर्ते वसंतराव शिवराम नेहे यांच्या त्या पत्नी, युवक कार्यकर्ते बाळासाहेब नेहे, अकोले महाविद्यालयातील लिपिक किरण नेहे, अलका अशोक काशीद, मनिषा रावसाहेब आभाळे यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पार्थिवावर सुगाव खुर्द येथील अमरधाम मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व स्तरातील मान्यवर, नातेवाईक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मोहनराव फलके यांचे निधन

**शेवगाव । वीरभूमी–**



शहरातील विद्यानगर येथील मोहनराव विठ्ठलराव फलके (वय ८०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. फलके यांनी सहकारी बँकेमध्ये सेवा केलेली असून सेवानिवृत्तीनंतर त्यांनी शेती व अध्यात्मामध्ये कार्य केले. सध्या ते विठ्ठल रुक्मिणी देवस्थान विद्यानगर येथील विश्वस्त होते. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे. येथील रेसिडेन्शिअल विद्यालयातील शिक्षक निलेश फलके व नितीन फलके यांचे ते वडील होत.

## ग्रामीण रस्ते व पाणंद रस्त्यांच्या अतिक्रमण हटविण्यासाठी मोफत पोलिस बंदोबस्त; जिल्हाधिकाऱ्यांचे परिपत्रक जारी

**श्रीगोंदा । वीरभूमी–**

ग्रामीण भागातील रस्ते, गाडीमार्ग, पायमाग व पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमणे हटविताना पोलिस बंदोबस्तासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नसल्याचे स्पष्ट करणारे परिपत्रक जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जारी केले आहे. तसेच रस्त्यांची मोजणी व सीमांकनासाठी भूमी अभिलेख विभागामार्फतही कोणतेही शुल्क आकारले जाणार नसल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या विविध शासन निर्णयांच्या अनुषंगाने ग्रामीण रस्ते, गाडीमार्ग, पायमाग आणि पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमणे हटवून त्यांना विशिष्ट क्रमांक देण्याची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या कारवाईदरम्यान आवश्यकतेनुसार पोलिस यंत्रणेची मदत घेण्यात येणार असून त्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही, असे परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

परिपत्रकानुसार, गाव नकाशांवर दर्शविण्यात आलेल्या शासकीय जागेवरील अतिक्रमण हटविण्यासाठी तहसीलदारांकडून संबंधितांना सात दिवसांची नोटीस देण्यात येईल. नोटिशीनंतरही अतिक्रमण न हटवल्यास प्रशासनामार्फत कारवाई करण्यात येणार आहे. तसेच इतर शेतकऱ्यांच्या ये–जा हक्कासाठी निश्चित करण्यात आलेल्या रस्त्यांवर पीक लागवड करता येणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

याशिवाय, रस्त्यांचे नुकसान करणाऱ्या व्यक्तींचे आधार कार्ड व फार्मर आयडी पाच वर्षांसाठी ब्लॉक करण्याची तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ रोखण्याची तरतूदही करण्यात आली आहे. पोलिस बंदोबस्त विनामूल्य उपलब्ध करून देण्याबरोबरच कारवाईत अडथळा निर्माण करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. तालुका स्तरावरील पोलिस निरीक्षकांनी आवश्यकतेनुसार बंदोबस्त उपलब्ध करून देण्याची दक्षता घ्यावी, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे. या शासन निर्णयाचा शेत – पाणंद रस्त्याचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी स्वागत केले आहे.

## पाथर्डी पोलिसांकडून अवैध गावठी दारू हातभट्टी उद्धस्त

**पाथर्डी । वीरभूमी–**

अवैध दारू निर्मिती व विक्रीविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत पाथर्डी पोलिसांनी पहाटेच्या सुमारास धडक कारवाई करत शंकरवाडी परिसरातील गावठी हातभट्टी उद्धस्त केली. या कारवाईत सुमारे एक लाख रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.



पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार पाथर्डी पोलीस स्टेशन हद्दीतील गोपाळ वस्ती, शंकरवाडी येथील शिवारात अवैधरित्या गावठी दारू निर्मिती सुरू असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाल्यानंतर पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने आज (दि. ३ जून) सकाळी सुमारे ६ वाजता दोन पंचांच्या उपस्थितीत छापा टाकला.

या कारवाईदरम्यान जालिंदर दत्तात्रय लोणारे (वय २२, रा. गोपाळ वस्ती, शंकरवाडी, ता. पाथर्डी) हा इसम गावठी दारू निर्मिती करत असल्याचे आढळून आले. घटनास्थळी तपासणी केली असता ७०० लिटर कच्चे रसायन (किंमत ७० हजार रुपये), १५० लिटर तयार गावठी दारू (किंमत ३० हजार रुपये), नवसागरच्या सहा वड्या तसेच दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण १ लाख ३४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.सदर कारवाईत समाजाच्या आरोग्यास घातक ठरणारे कच्चे रसायन जागीच नष्ट करण्यात आले. आरोपीस ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३, २७५ तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) व (फ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

अवैध दारू निर्मिती व विक्रीविरोधात पाथर्डी पोलीस सातत्याने कठोर भूमिका घेत असून अशा प्रकारच्या बेकायदेशीर धंद्यांविरुद्ध यापुढेही प्रभावी कारवाया सुरू राहणार असल्याचे पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले. सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे, विभागीय पोलीस अधीक्षक नीरज राजगुरू यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विलास पुजारी आदेशानुसार पोलीस उपनिरीक्षक विलास जाधव व पोलीस उपनिरीक्षक देवराव ढगे, हेड कॉन्स्टेबल संभाजी कुसाळकर, हेड कॉन्स्टेबल संदीप कानडे, पोलीस कॉन्स्टेबल भगवान टकले, संदीप कळमकर तसेच चालक पोलीस कॉन्स्टेबल गोविंद दराडे होमगार्ड किसन सदामत, ज्ञानेश्वर बडे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# एसटी बसच्या अपघातात १५ प्रवासी जखमी; दोघांची प्रकृत्ती गंभीर

**शेवगाव - अहिल्यानगर बसचा वृद्धेश्वर कारखाना परिसरात अपघात । दुचाकीला वाचवितांना घडला अपघात**

**पाथर्डी । वीरभूमी–**

शेवगावहुन अहिल्यानगरला जाणाऱ्या एसटी बसला दुचाकीने हुलकावणी दिल्याने झालेल्या अपघातात बसमधील सुमारे १५ प्रवाशी जखमी झाले. यातील दोघांची प्रकृत्ती गंभीर असून त्यांना पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे पाठविण्यात आले. हा अपघात पाथर्डी तालुक्यातील वृद्धेश्वर साखर कारखान्याच्या पेट्रोल पंपाजवळ मंगळवारी (दि. २) दुपारी चारच्या सुमारास झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, शेवगाव आगाराची एसटी बस (एमएच १४, बीटी ८४१२६) ही शेवगावहून अहिल्यानगरकडे जात होती. बसमध्ये ५२ प्रवाशी होते. दुपारी चार वाजण्याच्या सुमारास बस शेवगाव-तिसगाव मार्गे अहिल्यानगला जात असतांना वृद्धेश्वर कारखान्याच्या पेट्रोल पंपाजवळ एका दुचाकीने एसटी बसला हुलकावणी दिली. दुचाकीला वाचविण्याचा प्रयत्न केला असता चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने बस रस्त्यावरील पुलाच्या कठड्याला जावून आदळली. यामध्ये बसचे मागील चाके रॉडसह निखळून पडल्याने बस तशीच पुलाला अडकून बसली. अचानक अपघात झाल्याने बसमधील प्रवाशांमध्ये एकच आरडाओरडा झाला.

अपघातानंतर बसमधून डिझेल गळू लागल्याने धोका निर्माण झाला होता. स्थानिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. काही प्रवाशांनी बसच्या खिडक्यांमधून उड्या मारून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला, तर वृद्ध, महिला आणि इतर अडकलेल्या प्रवाशांना नागरिकांनी सुरक्षितपणे बाहेर काढले. या अपघातात सुमारे १५ जण जखमी झाले. यातील दोन प्रवाशांची प्रकृती गंभीर असल्याचे समजते. तर इतर प्रवाशांना किरकोळ जखमा झाल्या.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने मदतीसाठी धावून आले. यामध्ये नवनाथ तिजोरे, संतोष शेळके, गणेश काकडे, अनिल राजळे, रंगनाथ चितळे, राजेंद्र तुपे, वृषिकेश शिरसाठ, संतोष वाघमारे, अक्षय फुलारी, अक्षय पवार, सिमोन तिजोरे, स्वप्निल चितळे, अभिजीत शेळके, मच्छिंद्र म्हस्के, पप्पू बनकर, गणेश वेताळ, पप्पू लेंडगुळे, पवार सर, गणेश पवळे, नवनाथ पवार, संदीप काकडे यांनी बचाव कार्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या मदतीने जखमी प्रवाशांना रुग्णवाहिकांद्वारे तिसगाव, पाथर्डी आणि शेवगाव येथील रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले.



अपघाताची माहिती कळताच एसटी महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेतली. पाथर्डीचे पोलिस निरीक्षक विलास पुजारी यांनीही पथकासह घटनास्थळी येवून अपघाताचा पंचनामा केला. मोठा अपघात होवूनही नशिब बलवत्तार म्हणुन किरकोळ जखमा वगळता मोठी हानी टळली. बसचे मोठे नुकसान झाले असून पोलिस पुढील तपास करत आहेत.

# समृद्ध पंचायत राज अभियानात कासार पिंपळगावची जिल्हास्तरीय झेप

## तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावल्यानंतर जिल्हा पडताळणी समितीकडून पाहणी । लोकसहभाग, श्रमदान आणि महिला नेतृत्वाचे कौतुक

**● पाथर्डी । वीरभूमी–**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकावलेल्या कासार पिंपळगाव ग्रामपंचायतीची जिल्हास्तरीय पडताळणी समितीने मंगळवारी सविस्तर पाहणी केली. गावातील विकासकामे, लोकसहभाग, स्वच्छता, ग्रामविकास उपक्रम आणि ग्रामपंचायतीच्या प्रशासनिक कामकाजाची तपासणी करत समितीने समाधान व्यक्त केले. विशेष म्हणजे, सरपंच मोनालीताई राजळे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थ व युवकांनी सामुदायिक श्रमदानातून गावात विविध विकासकामे उभी करून जिल्हास्तरावरील स्पर्धेसाठी गाव सज्ज केले आहे.

राज्यात सुरू असलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत प्रत्येक तालुक्यातील निवडक ग्रामपंचायतींचा सहभाग निश्चित करण्यात आला होता. या अभियानात कासार पिंपळगाव ग्रामपंचायतीने उल्लेखनीय कामगिरी करत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला. त्यानंतर जिल्हास्तरावरही मानाचे स्थान मिळवण्याच्या उद्देशाने ग्रामपंचायतीने विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केली. गावातील स्वच्छता, वृक्षसंवर्धन, पाणी व्यवस्थापन, सार्वजनिक ठिकाणांचे सुशोभीकरण, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि लोकसहभागातून उभारण्यात आलेली विकासकामे यामुळे गावाने वेगळी ओळख निर्माण केली आहे.

मंगळवारी जिल्हास्तरीय पडताळणी समिती गावात दाखल होताच ग्रामस्थांनी उत्साहपूर्ण वातावरणात समितीचे स्वागत केले. ढोल-ताशांच्या गजरात तसेच शालेय विद्यार्थिनींच्या लेझीम सादरीकरणातून समिती सदस्यांचे स्वागत करण्यात आले. गावातील नागरिक, महिला बचतगट, आजी-माजी सैनिक संघ, युवक मंडळे आणि विविध सामाजिक संस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गावाच्या विकासप्रवासाची माहिती समितीसमोर मांडली.

जिल्हास्तरीय पडताळणी समितीचे प्रमुख म्हणून सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत शिंदे, प्रदीप मोरे यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांनी गावातील विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी ग्रामपंचायतीचे दप्तर, विविध योजनांची अंमलबजावणी, आर्थिक व्यवहारांची नोंद, ग्रामसभांचे आयोजन आणि लोकसहभागातून राबविण्यात आलेल्या उपक्रमांची सखोल पडताळणी करण्यात आली.

यावेळी बोलताना समिती प्रमुख विशाल नरवाडे म्हणाले, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात प्रत्येक तालुक्यातील सुमारे २० टक्के गावांची निवड करण्यात आली होती. अशा स्पर्धात्मक वातावरणात कासार पिंपळगावने तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवणे ही निश्चितच अभिमानास्पद बाब आहे. विशेष म्हणजे महिला सरपंचांच्या नेतृत्वाखाली गावाने विकासाची नवी दिशा स्वीकारली आहे. सरपंचांनी आपल्या संकल्पना आणि विकासदृष्टी प्रत्यक्ष कामांतून साकार केली असून त्याचा सकारात्मक परिणाम गावाच्या सर्वांगीण विकासात दिसून येत आहे.

ते पुढे म्हणाले, लोकसहभाग आणि श्रमदानाच्या बळावर ग्रामपंचायतीने केलेली कामे प्रेरणादायी आहेत. शासनाच्या विविध विकास अभियानांमध्ये सक्रिय सहभाग घेतलेल्या गावांनी नेहमीच प्रगती साधली आहे. अहिल्यानगर जिल्ह्याला समाजसुधारक आणि आदर्श ग्रामविकासाचे शिल्पकार अण्णा हजारे व पोपटराव पवार यांचा समृद्ध वारसा लाभला आहे. त्याच परंपरेत कासार पिंपळगावनेही ग्रामस्थांच्या एकजुटीच्या बळावर विकासाचा आदर्श निर्माण केला आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सरपंच मोनालीताई राजळे यांनी समितीचे स्वागत केले. ग्रामविकास अधिकारी प्रमोद म्हस्के यांनी प्रास्ताविकातून ग्रामपंचायतीच्या विकासकामांचा आढावा मांडला. सूत्रसंचालन राजू सुरवसे यांनी केले. यावेळी ग्रामस्थांनी लोकसहभाग आणि श्रमदानातून पूर्ण केलेल्या विविध विकासकामांचे सादरीकरण व्हिडिओ क्लिपद्वारे समितीसमोर करण्यात आले. त्यानंतर समितीने गावातील प्रत्यक्ष कामांची पाहणी करून आवश्यक कागदपत्रांची तपासणी केली.



गेल्या काही महिन्यांत गावातील नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने राबविलेल्या स्वच्छता मोहिमा, वृक्षसंवर्धन उपक्रम, सार्वजनिक ठिकाणांचे सुशोभीकरण, घनकचरा संकलन व विलगीकरण, शाळा परिसर विकास आणि पर्यावरणपूरक उपक्रमांची विशेष दखल समितीने घेतली. गावाच्या विकासासाठी ग्रामस्थ, महिला, युवक आणि ग्रामपंचायत प्रशासन यांनी एकत्रितपणे केलेल्या प्रयत्नांमुळे कासार पिंपळगाव आता जिल्हास्तरावरही यश संपादन करेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

समृद्ध पंचायत राज अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण विकासाचा नवा आदर्श निर्माण करणारे कासार पिंपळगाव आता जिल्हास्तरीय निकालाकडे आशेने पाहत असून, गावाच्या एकजुटीचा आणि लोकसहभागाचा हा विकासमॉडेल इतर ग्रामपंचायतींसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

# पाथर्डी पोलिसांची अवैध हत्यारांविरोधातील कारवाई

## कौडगाव आठरे येथे तलवार व लोखंडी पाईप, चैनकव्हर हत्यारासह एक जण ताब्यात

**● पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैध हत्यारांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत तालुक्यातील कौडगाव आठरे येथे एका इसमाकडून तलवार व लोखंडी पाईपची चेन जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी आरोपी बाबासाहेब बर्डे (वय ५२ कौडगाव ता.पाथर्डी) या व्यक्तीविरुद्ध पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २ जून रोजी पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांना कौडगाव आठरे येथील पाण्याच्या टाकीजवळ एक व्यक्ती हातात तलवार घेऊन फिरत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांचे विशेष पथक तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिसरात छापा टाकून संशयित व्यक्तीची तपासणी केली असता त्याच्याकडे विनापरवाना एक तलवार व लोखंडी पाईपपासून बनविलेली चैनकव्हर हत्यार आढळून आली.

पोलिसांनी अवैधरित्या बाळगण्यात आलेली तलवार व चैन हत्यार जप्त करून संबंधित इसमाला ताब्यात घेतले. त्याच्याविरुद्ध शस्त्र कायद्यान्वये पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

अवैध हत्यारे, गावठी कट्टे अथवा इतर बेकायदेशीर शस्त्रे कोणाकडे असल्याची माहिती नागरिकांना मिळाल्यास त्यांनी तात्काळ पोलिसांना गोपनीयरीत्या कळवावे, असे आवाहन पाथर्डी पोलीस स्टेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलबर्मे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या मोहिमेत पोलीस कर्मचारी आबासाहेब तांबे, अल्ताफ शेख, इजाज सय्यद, सागर बुधवंत, ज्ञानेश्वर संजय जाधव यांनी सहभाग घेतला.

# लोणीव्यंकनाथमध्ये भूमिपुत्रांचा सन्मान; सैनिक, शिक्षक व जवानांचा गौरव

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

लोणीव्यंकनाथ ग्रामपंचायत व अग्नीपंख फाउंडेशन यांच्या वतीने गावातील भारतीय सैन्य दलातील जवान, सेवानिवृत्त जवान, शिक्षक, अधिकारी तसेच सैन्य दलात नव्याने भरती झालेल्या जवानांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी उपसभापती गणपतराव काकडे होते. यावेळी भारतीय सैन्य दलातील सेवानिवृत्त जवान नितीन काकडे, शिक्षक डी. आर. काकडे, रामदास साळवे, राजाराम गायकवाड, रामदास फटाकडे, अधिकारी शिवाजी जाधव तसेच सैन्य दलात भरती झालेला जवान अर्जुन धोत्रे यांचा उत्कृष्ट कामगिरीबद्दल सन्मान करण्यात आला.



सन्मान सरपंच मनीषा नाहाटा, उपसरपंच चित्राताई धाकड, तंटामुक्ती अध्यक्ष ज्ञानदेव बापू मगर, सोसायटी अध्यक्ष बाळासाहेब थोरात, माजी अध्यक्ष लालासाहेब काकडे व गोरख ओव्हळ यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्य बाजार समितीचे सभापती बाळासाहेब नाहाटा यांनी केले.

यावेळी गणपतराव काकडे, मधुकर पवार, दिलीप काकडे, डी. आर. काकडे, शिवाजी जाधव व राजाराम गायकवाड यांनी मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमास राजेंद्र कुंदांडे, एम. डी. खंडागळे, बंडू खंडागळे, भास्कर कुंदांडे, लियाकत तांबोळी, सदाशिव खंडागळे, हनुमंत मगर, राहुल गोरखे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन गणेश गायकवाड यांनी केले.

# जलव्यवस्थापन आणि दुग्धोत्पादनातील धवल क्रांतीत कै. मधुकरराव पिचड यांचे योगदान उल्लेखनीय

## डॉ. सुनील शिंदे । अगस्ती महाविद्यालयात जयंती व्याख्यान; पॉलिटेक्निक कॉलेजला 'लोकनेते मधुकरराव पिचड' यांचे नाव

**● अकोले । वीरभूमी–**

सत्तेत असताना आणि सत्तेबाहेर असतानाही कै. मधुकरराव पिचड यांचा लढाऊ बाणा कायम राहिला. भंडारदरा धरणावरील पाण्याच्या हक्कासाठीचा संघर्ष, निळवंडे धरण उभारणीतले योगदान आणि दुग्धोत्पादन क्षेत्रातील धवल क्रांती यासंदर्भातील त्यांचे कार्य विशेष उल्लेखनीय ठरले, असे प्रतिपादन डॉ. सुनील शिंदे यांनी केले.

अगस्ती महाविद्यालय आणि अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कै. मधुकरराव पिचड जयंती व्याख्यानमालेत प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजवादी व शेतकरी नेते दशरथराव सावंत होते.

कै. पिचड यांच्या कार्याचा तीन टप्प्यांतील वेध घेताना डॉ. शिंदे म्हणाले, ज्येष्ठ गांधीवादी नेते कै. प्रा. ग. प्र. प्रधान, समाजवादी नेते व 'वनराई'चे माजी अध्यक्ष कै. मोहन धारिया तसेच प्रकाश आंबेडकर यांसारख्या अभ्यासू नेत्यांनीही पिचड यांच्या आदिवासी विकाससंदर्भातील कार्याची आणि मंत्रीपदावरील कामगिरीची प्रशंसा केली होती. त्यांच्या पहिल्या विधानसभा निवडणुकीच्या उमेदवारीला मंजुरी देताना तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी त्यांची अचूक पारख केली होती. त्यामुळे अकोले तालुक्याच्या विकासाला नवी दिशा मिळाली.

समयसूचकता आणि धाडस ही पिचड यांच्या कार्याची बलस्थाने होती. लिफ्ट इरिगेशन योजना, छोटे-मोठे पक्के बंधारे, पुलांची निर्मिती, सबमर्सिबल कॉजवे आणि दुग्ध व्यवसायातील क्रांती अशा विविध क्षेत्रांत त्यांनी चिरस्थायी ठसा उमटविला. प्रभावी जलव्यवस्थापनाबाबत त्यांचे धोरण कृतीशील स्वरूपात अधोरेखित झाले, असेही त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात दशरथराव सावंत म्हणाले, प्रशासनावर कै. पिचड यांचे विलक्षण नियंत्रण होते. प्रसंगी कायद्याच्या चौकटीत आवश्यक लवचिकता ठेवून त्यांनी धरणग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी पुनर्वसन केले. हा महाराष्ट्रातील पहिला प्रयोग मानला जातो. उपेक्षित आणि वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. तालुक्याच्या सर्वांगीण विकासाचा अभ्यासपूर्ण ताळेबंद त्यांच्या अजेंड्यावर असायचा.

राजूरच्या माजी सरपंच हेमलताताई पिचड यांनी मनोगतातून कै. मधुकरराव पिचड यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याचा आढावा घेत त्यांच्या कार्यकुशलतेचे विविध पैलू उलगडून सांगितले.

यावेळी एआयसीटीईच्या मंजुरीनुसार पॉलिटेक्निक कॉलेजचे नामकरण 'लोकनेते मधुकरराव पिचड पॉलिटेक्निक कॉलेज, अकोले' असे करण्यात आले. त्यानिमित्ताने नामफलकाचे अनावरण हेमलताताई पिचड, दशरथराव सावंत, कायम विश्वस्त गिरजाजी जाधव, संस्थेचे अध्यक्ष सुनील दातीर, सचिव सुधाकर देशमुख, खजिनदार धनंजय संत, प्राचार्य डॉ. भास्कर शेळके, डॉ. सुनील शिंदे आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.



कार्यक्रमात सेवानिवृत्त प्राचार्य व साहित्यिक डॉ. भास्कर शेळके यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच 'अगस्त्य' या वार्षिक नियतकालिकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कायम विश्वस्त गिरजाजी जाधव यांनी केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुनील दातीर, सचिव सुधाकर देशमुख, खजिनदार धनंजय संत, कार्यकारिणी सदस्य ॲड. आनंदराव नवले, यशवंत आभाळे, सुधाकर आरोटे, श्रीमती कल्पना सुरपुरिया, शिक्षणाधिकारी संपत मालुंजकर, डॉ. आर. डी. पल्हाडे, डॉ. प्रशांत तांबे, प्रभारी प्राचार्य डॉ. शिवाजी खेमनर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. आभार प्रदर्शन सचिव सुधाकर देशमुख यांनी केले.